ePaper

# 400 कोटींचा पूल 4 वर्षांत कोसळला; भ्रष्टाचाराचा स्फोट!

वर्ष - 9 I अंक - 179 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 24 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!







पान 2 वरुन...

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर पुन्हा अपघात


## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भावूक : अजितदादांच्या निधनाचा शोकप्रस्ताव

# महाराष्ट्राला न लाभलेले सर्वोत्तम मुख्यमंत्री!

महाईन्यूज । मुंबई

**राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशात अजित पवार यांच्या निधनाचा शोकप्रस्ताव मांडला. यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की, कधीही असा विचार केला नाही की, अशाप्रकारचा प्रस्ताव मला मांडावा लागेल. मी माझा जवळचा एक मित्र गमावला आहे.**

यावेळी फडणवीस यांनी 27 जानेवीरी 2026 रोजी अजितदादा यांच्यासोबतच्या बैठक काय घडले आणि ती शेवटची दादांसोबत भेट होती, याची किंचतही कल्पना नव्हती. दादा कधीही वेळ चुकवणारे नव्हते. मात्र, अपघाताच्या दिवशी त्यांची वेळ चूकली. अजित पवार शब्दाला जागणारा माणूस होता. दादांना सामान्य माणसांच्या अडचणी माहिति होत्या. अजित पवार यांच्यात मुख्यमंत्रिपदाची क्षमता होती, असेही मोठे विधान देवेंद्र फडणवीस यांनी केले. अजित पवार सहा वेळा राज्याचे उपमुख्यमंत्री झाले आणि मुख्यमंत्री होण्याचे त्यांचे स्वप्न होते. मुख्यमंत्र्यांनी म्हटले की, सर्वाधिक वेळा उपमुख्यमंत्री होण्याचा मान त्यांना मिळाला. दादा नेहमीच म्हणायचे की, मी कधीतरी मुख्यमंत्री होईल. पण मी उपमुख्यमंत्री मात्र नेहमी राहिल. मी आज हे म्हणून शकतो की, अजितदादा पवार हे सर्वोत्तम मुख्यमंत्री झाले असते. एक जो चांगला मुख्यमंत्री महाराष्ट्राला मिळू शकला असता तो आज अजित पवारांच्या रूपाने आपल्यात नाही. कधीतरी नियतीने त्यांचे ते स्वप्नही पूर्ण केले असते. शेवटी राजकारणात वेगवेगळ्या प्रकारचे गणिते असतात. पण क्षमतेचा विचार केला असता मुख्यमंत्री पदाकरिता पूर्णपणे क्षमता असलेले नेतृत्व अजित पवारांचे होते, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. दु:ख बाजूला सारून सुनेत्रा वहिणी कामाला लागल्या. विकासप्रकल्पांच्या बाबतीत अजित पवार कायमच सकारात्मक असायचे. अजित पवार यांच्यासोबत अनेक गोष्टींवर चर्चा व्हायच्या. अजित पवार यांना दूध प्यायला आवडायचे. आमचे हेलिकॉप्टर असो किंवा विमान त्यामध्ये कायम दूध असायचे. अजितदादा 12 चा कार्यक्रम असेल तर अजितदादा 11.59 ला बैठकीला असायचे. मंत्रालयातील बैठकीला अजितदादा अधिकाऱ्यांपेक्षा लवकर पोहोचत. म्हणून कमीही काम थांबले आहे किंवा दादा नसल्याने फाईल पुढे गेली नाही, असे कधीही घडले नाही. मंत्रीमंडळात कितीही विषय असले तरीही ते अभ्यास करून यायचे.



## ब्लॅकबॉक्स जळून गेला, ही माझी सर्वात मोठी शंका..

दरम्यान, काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असे म्हणाले की, अनेक जण शंका-कुशंका उपस्थित करत असले तरी, तुमच्याकडे काही ठोस पुरावे असतील तर..., यावर बोलताना आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले की, "ब्लॅकबॉक्स जळून गेला, ही माझी सर्वात मोठी शंका आहे.  जगातल्या कुठल्याही विमान अपघातात त्या विमानाचा ब्लॅक बॉक्स जळून गेला, असं कधीही सांगितलं गेलेलं नाही. त्यामुळे, शंकेला जर चौकशीच्या माध्यमातूनच वाव मिळणार असेल, तर शंका या उपस्थित होणारच." "जेवढा चौकशीला उशीर करतील, जेवढी चौकशी लांबवतील, जेवढ्या खोट्या नाट्या गोष्टी सांगतील, की ब्लॅक बॉक्स जळून गेला, तेवढ्या संशयाला वाव मिळण्यास जागा निर्माण होत आहेत." असेही आव्हाड म्हणाले.

## “त्या काळ्या दिवसाने आमचा हा आधार हिरावून नेला”

एकनाथ शिंदे यांनी यावेळी माजी मंत्री सुरूपसिंग हिऱ्या नाईक, माजी विधान परिषद सदस्य अशोक गजानन मोडक, गंगाधर पटने, श्रीमती निला देसाई या दिवंगत सदस्यांना देखील श्रध्दांजली अर्पण केली. अजितदादांच्या आठवणींना उजाळा देताना एकनाथ शिंदे म्हणाले की, मी, देवेंद्रजी आणि अजितदादा म्हणजे राज्याच्या स्थैर्याचा एक भक्कम ‘ट्रँगल ऑफ स्टॅबिलिटी’ होतो. आम्ही तिघे एकत्र आलो म्हणून महाराष्ट्राची भूमिती आणि प्रगती वेगाने सुरू होती. २८ जानेवारीच्या त्या काळ्या दिवसाने आमचा हा आधार हिरावून नेला.

## “जगाचा निरोप घेण्याचा निर्णय मात्र चुकला”

लाखांचा पोशिंदा जावा आणि लाखो लोक अनाथ व्हावेत, अशीच काहीशी अवस्था अजितदादांच्या जाण्याने झाली आहे. दादा, राजकारणात आपण घेतलेले अनेक निर्णय अचूक होते हे जनतेच्या न्यायालयाने सिद्ध केले आहे, पण तुमचा हा जगाचा निरोप घेण्याचा निर्णय मात्र चुकला आहे. तो मागे घ्या आणि परत या, अशा भावूक शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिवंगत नेते अजित पवार यांना विधान परिषदेत श्रद्धांजली वाहिली.

## दादांवर नको नको ते आरोप झाले..; आमदार रोहित पवार

अजित पवार हे सभागृहात पहिला येणारा आणि शेवटी जाणारा नेता असायचे. चुकले तर कान पकडायचे व चांगले बोललो की स्तुती करायचे. व्यक्तिगत, बेकायदेशीर विषय घेऊन आलेल्यांचा त्यांना राग यायचा, अशी आठवण रोहित पवार यांनी काढली. दादांवर नको नको ते आरोप झाले. दादा तेव्हा अस्वस्थ व्हायचे. पण एकही आरोप सिद्ध करता आला नाही. दादा आता नाहीत, त्यामुळे ते आरोप व ते डाग आता पुसले पाहिजेत. आरोपांचे गाठोडे समुद्रात टाकले गेले तर ती त्यांना आदरांजली ठरेल, अशी मागणी आमदार रोहीत पवार यांनी केली. माझे लग्न हे दादांनी ठरवले होते. पक्ष वेगळा झाला तेव्हा काही गोष्टी बोलल्या गेल्या असतील. गेल्या काही महिन्यात आमच्या बैठका झाल्या. प्रशासनावर वचक असणारा नेता गेला. लोकनेता गेला, रूबाब गेला. रांगडेपणा गेला, असं रोहित पवार म्हणाले.

# 'मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे' वर पुन्हा अपघात

## ज्वलनशील गॅसची वाहतूक करणाऱ्या टँकरला अपघात

**महाईन्यूज । पुणे**

**मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर खंडाळा घाटातील आडोशी बोगद्याच्या प्रवेशद्वारावर ३ फेब्रुवारीला प्रोपलीन या ज्वलनशील गॅसची वाहतूक करणाऱ्या टँकरच्या अपघातानंतर उद्भवलेल्या अभूतपूर्व वाहतूक, त्यामुळे झालेल्या समस्यांचे परिणाम, पडसाद अजूनही ताजे असताना आज सकाळी सव्वा दहाच्या सुमारास पुन्हा एकदा टँकरला अपघात झाला आहे.**



अंजन पुलाजवळील तीव्र उतार व वळणावर पुन्हा एकदा प्रोपलीन या ज्वलनशील गॅसची वाहतूक करणाऱ्या टँकर चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने टँकरला अपघात झाला. मात्र हा टँकर मार्गालगत असलेल्या डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या गटारात जाऊन अडकल्याने मोठा अनर्थ टळला आणि सर्वांचा जीव भांड्यात पडला. जर टँकर उलटला असता तर, पुन्हा २० दिवसांपूर्वी झालेल्या अपघाताची पुनरावृत्ती झाली असती.

खंडाळा महामार्ग पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी सकाळी कोचीहून गुजरातला प्रोपलीन या ज्वलनशील गॅस घेऊन जाणाऱ्या टँकर (क्रमांक- एनएल-०१/एएफ-५०४०) चालकाचे खंडाळा घाटातील अमृत अंजन पुलाजवळील तीव्र उतार व वळणावर गाडीवरील नियंत्रण सुटल्याने टँकर मार्गालगत असलेल्या डोंगराच्या पायथ्याशी असलेले सिमेंटचे दुभाजक तोडून मार्गालगतच्या गटारात जाऊन अडकला अन् मोठा अनर्थ टळला.

अपघाताची माहिती मिळताच अपघातस्थळापासून तीनशे मीटर अंतरावर असलेल्या बोरघाट (दस्तुरी) महामार्गाचे सहायक पोलिस निरीक्षक स्वप्निल पाटील, निलेश सरोदे, खोपोली पोलीस निरीक्षक सचिन हिरे, रसायनतज्ज्ञ धनंजय गीध यांनी आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेत घटनेची पाहणी करून पुण्याहून मुंबईकडे जाणारी वाहतूक थांबवली आणि युद्धपातळीवर अपघातग्रस्त गॅस टँकर हटवण्याची मोहीम सुरू केली. अर्धा तासात अपघातग्रस्त गॅस टँकर क्रेनच्या सहाय्याने सुरक्षितपणे हटवून सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आला. अपघातग्रस्त गॅस टँकर हटवल्यानंतर काही वेळाने मुंबईकडे जाणारी वाहतूक सुरू करण्यात आली. या घटनेचे वृत्त समजताच सर्वत्र पुन्हा एकदा भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. २० दिवसांपूर्वी झालेल्या अपघाताच्या घटना पुन्हा ताज्या झाल्या होत्या. त्यावेळच्या परिस्थितीचे चित्र सर्व प्रशासन, यंत्रणा आणि प्रवाशांच्या डोळ्यांसमोर उभे राहिले. अपघात किरकोळ असल्याचे समजल्यानंतर सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. ३ फेब्रुवारीला प्रोपलीन गॅसची वाहतूक करणाऱ्या टँकरच्या अपघातामुळे मुंबई पुणे एक्सप्रेस वेवर आणि जुन्या मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर अभूतपूर्व अशी ३८ तास वाहतूक कोंडी झाली होती. या अपघातानंतर उद्भवलेल्या अभूतपूर्व वाहतूक, त्यामुळे झालेल्या समस्यांचे परिणाम, पडसाद पुन्हा उमटू लागले होते. मात्र सुदैवाने मागच्या गॅस टँकरप्रमाणे हा गॅस टँकर मार्गावर उलटला नाही.

# पुणे विमानतळाची जागतिक झेप; आंतरराष्ट्रीय उड्डाणांमध्ये वाढ

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे विमानतळाने जागतिक स्तरावर आपली मोहोर उमटवत 2025 या वर्षात आंतरराष्ट्रीय विमान वाहतुकीत नवी विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. 2024 च्या तुलनेत 2025 मध्ये आंतरराष्ट्रीय विमानोड्डाणांमध्ये 74 टक्के, तर प्रवाशांच्या संख्येत तब्बल 64 टक्क्यांची वाढ झाली असून, पुणे विमानतळ हे पश्चिम महाराष्ट्रातील एक प्रमुख आंतरराष्ट्रीय केंद्र (इंटरनॅशनल हब) म्हणून उदयास येत असल्याचे चित्र समोर येत आहे.**




> पुणे विमानतळावरून आंतरराष्ट्रीय प्रवासाला मिळणारा प्रतिसाद सकारात्मक आहे. विशेषतः नवीन टर्मिनल कार्यान्वित झाल्यानंतर प्रवाशांच्या सोयी-सुविधांमध्ये मोठी सुधारणा झाली आहे. सन 2024 च्या तुलनेत 2025 मध्ये प्रवासी आणि उड्डाणांच्या संख्येत झालेली ही वाढ विमानतळाच्या विस्तार धोरणाचे यश आहे. प्रवाशांची मागणी लक्षात घेऊन भविष्यात आणखी काही आंतरराष्ट्रीय शहरांशी पुणे जोडण्यासाठी प्रयत्न केले जातील.
>
> - संतोष ढोके, संचालक, पुणे विमानतळ.

विमानतळ प्रशासनाने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार,सन 2024 मध्ये पुणे विमानतळावरून 2 लाख 5 हजार 460 प्रवाशांनी



आंतरराष्ट्रीय प्रवास केला होता. त्यासाठी त्याच वर्षभरात 1,492 विमानोड्डाणे झाली होती. मात्र, 2025 मध्ये हे चित्र पूर्णपणे बदलले आहे. 2025 या वर्षात एकूण 3 लाख 38 हजार 770 प्रवाशांनी सातासमुद्रापार प्रवास केला असून, आंतरराष्ट्रीय उड्डाणांची संख्याही वाढून या वर्षात 2,601 वर पोहचली आहे. प्रवासीसंख्येतील ही 1.33 लाखांची वाढ पुण्याच्या वाढत्या आर्थिक आणि औद्योगिक क्षमतेचे निदर्शक मानली जात आहे.

> पुण्याहून आंतरराष्ट्रीय उड्डाणांची संख्या वाढणे, ही प्रवाशांसाठी आनंदाची बाब आहे. आता दुबई, सिंगापूर आणि बँकॉकसारख्या प्रमुख आंतरराष्ट्रीय शहरांसाठी थेट विमानसेवा उपलब्ध आहे. पूर्वी दुबई किंवा सिंगापूरला जाण्यासाठी मुंबई विमानतळ गाठावे लागायचे. त्यामुळे वेळ आणि पैसा दोन्ही वाया जायचे. आता पुण्यातूनच थेट विमानसेवा उपलब्ध झाल्यामुळे आमचा प्रवास सुखकर झाला आहे. मात्र, बँकॉक आणि दुबईप्रमाणेच आता युरोप आणि अमेरिकेसाठीही पुण्यातून थेट कनेक्टिव्हिटी मिळावी, अशी आमची अपेक्षा आहे.
>
> - प्रेरणा सांगळे, नियमित आंतरराष्ट्रीय प्रवासी.

### सध्याचे मार्ग व वाढती मागणी

सध्या पुण्याहून दुबई (शारजाह), सिंगापूर आणि बँकॉकसारख्या प्रमुख आंतरराष्ट्रीय शहरांसाठी थेट विमानसेवा उपलब्ध आहे. आयटी प्रोफेशनल, उद्योजक आणि पर्यटकांकडून या मार्गांना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. मात्र, पुण्याचे वाढते महत्त्व पाहता पुणेकरांनी आता युरोप आणि अमेरिकेसाठी थेट विमानसेवा सुरू करण्याची तसेच सध्याच्या उड्डाणांच्या फेऱ्या वाढविण्याची मागणी लावून धरली आहे.

# “पाणीबाणी” टाळण्यासाठी उपाययोजना!

## आमदार शंकर जगताप यांची बैठक : महापालिका प्रशासनाला सूचना

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड शहरातील प्राधिकरण सेक्टर २३ येथे आमदार शंकर जगताप यांच्या नेतृत्वाखाली पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत सविस्तर आढावा बैठक पार पडली. आगामी मार्च ते मे या उन्हाळी कालावधीत पाणीटंचाई व वाढत्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर शहराच्या पाणी व्यवस्थापनाला अधिक सक्षम आणि शाश्वत करण्यासाठी त्यांनी ठोस निर्देश दिले.**



धरणातून दररोज सुमारे ६५० एमएलडी पाणी उचलले जात असताना जवळपास २५ टक्के पाणी गळतीमुळे वाया जात असल्याची गंभीर बाब आमदार जगताप यांनी अधोरेखित केली. गळती रोखण्यासाठी स्वतंत्र तांत्रिक मोहीम राबवून जबाबदारी निश्चित करण्याचे निर्देश त्यांनी दिले. महापालिका हद्दीबाहेरील बांधकामांना होणारा पाणीपुरवठा तात्काळ थांबवण्याचा प्रस्ताव सभेत मांडावा, तसेच अनधिकृत नळजोडांवर मोहीम राबवून मोटार पंप बसवणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश आमदारांनी दिले.

### समन्वयातून नियमित पाणीपुरवठ्याचा निर्धार

या बैठकीला पक्षनेते प्रशांत शितोळे तसेच पिंपरी-चिंचवड महापालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते. पिंपरी-चिंचवडकरांना नियमित, नियोजनबद्ध व पारदर्शक पाणीपुरवठा मिळावा यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करणे अत्यावश्यक असल्याचे आमदार शंकर जगताप यांनी स्पष्ट केले. शहराच्या दीर्घकालीन पाणी सुरक्षेसाठी ठोस धोरणात्मक निर्णय घेण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### सांडपाणी पुनर्वापर व रेन वॉटर हार्वेस्टिंगवर भर

पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त वापरासाठी सांडपाणी प्रक्रिया करून त्याचा सक्तीने पुनर्वापर करण्याचे धोरण आखण्याची सूचना आमदार जगताप यांनी केली. शहरात सरासरी २१० ते २५० मिमी पाऊस पडत असून यंदा २५० मिमी पावसाची नोंद झाली आहे. तरीही रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रभावी नसल्याबाबत त्यांनी नाराजी व्यक्त करत पावसाच्या पाण्याची साठवण व भूजल पुनर्भरणासाठी ठोस उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले.

### वाढत्या लोकसंख्येचा विचार करून नियोजन



या बैठकीला पक्षनेते प्रशांत शितोळे तसेच पिंपरी-चिंचवड महापालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते. पिंपरी-चिंचवडकरांना नियमित, नियोजनबद्ध व पारदर्शक पाणीपुरवठा मिळावा यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करणे अत्यावश्यक असल्याचे आमदार शंकर जगताप यांनी स्पष्ट केले. शहराच्या दीर्घकालीन पाणी सुरक्षेसाठी ठोस धोरणात्मक निर्णय घेण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

> “ पिंपरी-चिंचवडकरांना नियमित, स्वच्छ आणि नियोजनबद्ध पाणीपुरवठा मिळणे ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. ६५० एमएलडी पाणी उचलूनही २५ टक्के गळती होणे हे स्वीकारार्ह नाही. गळती रोखण्यासाठी विशेष तांत्रिक मोहीम राबवू, अनधिकृत नळजोडांवर कठोर कारवाई करू आणि सांडपाण्याच्या पुनर्वापरासह रेन वॉटर हार्वेस्टिंगला गती देऊ. शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन दीर्घकालीन व शाश्वत पाणीपुरवठा व्यवस्था उभी करण्यासाठी प्रशासनासोबत समन्वयाने ठोस निर्णय घेऊ.
>
> - शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा.

# इंद्रायणी नदी प्रदूषणास जबाबदार कंपन्यावर कारवाई

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतून वाहणाऱ्या इंद्रायणी नदीत प्रदूषण करणाऱ्या संबंधित कंपन्या व संस्थांवर प्रशासनामार्फत कडक कारवाई करण्यात येणार आहे. पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाही. इंद्रायणी नदी स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी प्रशासनासोबतच नागरिकांनीही सामूहिक जबाबदारी स्वीकारून पुढाकार घ्यावा असे आवाहन महापौर रवी लांडगे यांनी केले.**



महापौर रवी लांडगे, आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुहाडे यांच्या उपस्थितीत सात मावळे संवर्धन संस्थेमार्फत इंद्रायणी नदी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानाचा मुख्य उद्देश इंद्रायणी नदीतील वाढत्या प्रदूषणाच्या समस्येकडे लक्ष वेधणे तसेच नदी स्वच्छतेसाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा होता. या स्वच्छता मोहिमेदरम्यान महापौर लांडगे यांनी स्वतः इंद्रायणी नदीच्या पात्रात उतरून स्वच्छता उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला. प्रत्यक्ष पाहणी करताना नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर साचलेला कचरा, औद्योगिक सांडपाणी, प्लास्टिक कचरा तसेच इतर घातक घटकांची त्यांनी पाहणी करून नदीच्या प्रदूषणामागील संभाव्य कारणांचा त्यांनी प्रत्यक्ष आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. या पाहणीनंतर महापौर लांडगे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतून इंद्रायणी नदीत सोडण्यात येणारे प्रदूषित सांडपाणी, औद्योगिक कचरा आणि पर्यावरणास हानिकारक घटक यांस जबाबदार असलेल्या संबंधित कंपन्या तसेच इतर संस्थांवर प्रशासनामार्फत कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा दिला. इंद्रायणी नदीचे पावित्र्य आणि पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी प्रशासन, सामाजिक संस्था आणि नागरिक यांनी एकत्रितपणे पुढाकार घेण्याची गरज असल्याचे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. याशिवाय या स्वच्छता अभियानामुळे नदी संवर्धनाच्या दिशेने सकारात्मक पाऊल उचलले गेले असून भविष्यात अशा मोहिमा सातत्याने राबविण्यात येणार असल्याचेही प्रशासनातर्फे सांगण्यात आले. या उपक्रमात सात मावळे संवर्धन संस्थेचे पदाधिकारी, स्थानिक नागरिक तसेच महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. इंद्रायणी नदी स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त करण्यासाठी अशा लोकसहभागातून राबविण्यात येणाऱ्या मोहिमांना भविष्यात अधिक गती तसेच प्रोत्साहन दिले जाईल असे देखील महापौर लांडगे यांनी यावेळी सांगितले.



## भूमिका

**देशाच्या वाहतूक क्षेत्रात सहकारी तत्वांवर आधारित व्यवसायाची संकल्पना साकार होत आहे. केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी सोमवारी 'भारत टॅक्सी' उपक्रम सादर करत देशाच्या सहकारी चळवळीला नव्या दिशेची दृष्टी दिली. हा उपक्रम केवळ कॅब व ऑटो चालवणाऱ्या व्यक्तींना रोजगाराचा साधन नाही, तर त्यांना भागीदार म्हणून स्थान देणारा अभिनव मॉडेल आहे.**

# 'भारत टॅक्सी': सहकाराच्या नव्या युगाकडे प्रवास!

'भारत टॅक्सी'ची रचना पारंपरिक व्यवसाय मॉडेलपेक्षा वेगळी आहे. चालकांना योजनेत सहभागी होण्यासाठी फक्त ५०० रुपयांची गुंतवणूक करावी लागते. यामुळे ते केवळ कर्मचारी नाहीत, तर कंपनीचे सह-मालक बनतात. हा छोटा आर्थिक सहभाग, पण मोठा भावनिक व व्यावसायिक गुंतवणूक म्हणून काम करतो. सहभागी चालकांना नफ्यातून त्यांच्या योगदानानुसार हिस्सा मिळेल, तर किमान भाड्याची हमी देण्यात येईल. यामुळे चालकांच्या आर्थिक सुरक्षिततेची हमीही राहणार आहे. उदाहरणार्थ, जर 'भारत टॅक्सी'ला २५ कोटी रुपयांचा नफा झाला, तर त्यातील २०% भांडवलात जमा केले जाईल आणि उर्वरित ८०% लाभ चालकांच्या खात्यात जमा केला जाईल. या संकल्पनेत पारदर्शकता, सहभाग, व लाभाचे सामंजस्य यावर भर देण्यात आला आहे. सुरुवातीच्या तीन वर्षांत संयम ठेवण्याची आवश्यकता आहे, जी दीर्घकालीन यशासाठी अत्यावश्यक आहे.

शहा यांनी 'भारत टॅक्सी'च्या मॉडेलची तुलना अमूलच्या सहकारी प्रणालीशी केली. जिथे ३६ लाख उत्पादक माता-भगिनींनी प्रत्येकी ५० रुपये गुंतवले आणि आजची उलाढाल ₹१,२५,००० कोटींपर्यंत पोहोचली आहे, तिथून शिकता येणारे अनेक धडे आहेत. खाजगी डेअरी कंपन्यांमध्ये जास्तीत जास्त नफा मालकांकडे जातो; मात्र अमूलमध्ये ८५% नफा उत्पादकांना परत दिला जातो. 'भारत टॅक्सी'साठी ही प्रेरणा अत्यंत सुसंगत आहे – ज्यामुळे चालकांना त्यांच्या मेहनतीचे योग्य मूल्य मिळेल.

सामाजिक न्याय व आर्थिक भागीदारी यांची संगमशाळा यात दिसून येते. पारंपरिक व्यवसायात नफा साधारणतः मालकांचा व ठराविक उच्च पदस्थांचा असतो; परंतु सहकारी मॉडेलमध्ये उत्पादन, मेहनत, व योगदान यांचे मूल्यांकन करून सर्वांचा लाभ सुनिश्चित केला जातो. यातून कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि दीर्घकालीन टिकाव सुनिश्चित होतो.




'भारत टॅक्सी' केवळ व्यवसाय मॉडेल नाही, तर वाहतूक क्षेत्रातील सहकारी आदर्श आहे. चालकांना किमान भाड्याची हमी, नफ्याचे वाटप, व संचालक मंडळावर प्रतिनिधित्व मिळण्याची संधी या सगळ्यामुळे हा उपक्रम अभिनव ठरतो. देशात लाखो कॅब व ऑटो चालक काम करतात, ज्यांचा आर्थिक सुरक्षिततेच्या दृष्टीने अनेकदा विचार होत नाही. 'भारत टॅक्सी' यामुळे त्यांना स्वतःच्या मेहनतीतून अतिरिक्त नफा मिळेल, ज्यामुळे आर्थिक परिस्थिती सुधारेल आणि कामगारांचा आत्मविश्वास वाढेल.

उपक्रमातील 'सह-मालकत्व' ही संकल्पना चालवणाऱ्यांना फक्त भाड्याचे उत्पन्न मिळवण्यापुरती मर्यादित ठेवत नाही, तर त्यांच्या निर्णय प्रक्रियेत सहभाग देऊन त्यांना कंपनीच्या यशाचा भागीदार बनवते. यातून व्यवसायाच्या नैतिकतेत वाढ होते, कारण सर्व भागीदारांना नफा, जोखीम, व जबाबदारी यांचा अनुभव प्रत्यक्ष मिळतो.

सहकारी मॉडेल देशाच्या अर्थव्यवस्थेवरही सकारात्मक परिणाम करू शकते. चालकांच्या सहभागामुळे नगदी प्रवाह स्थिर राहतो, नफा अधिक व्यापक प्रमाणात समाजात परतवला जातो आणि गरजूंना मदत मिळते. छोटे योगदान, मोठा लाभ हा तत्त्व 'भारत टॅक्सी'मध्ये स्पष्ट दिसून येतो. यामुळे उत्पन्नाचा अधिक समतोल वितरण होतो, ज्याचा फायदा आर्थिक असमानतेवरही होतो. याशिवाय, हा उपक्रम नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करेल, व्यवसायातील पारदर्शकता वाढवेल, आणि ग्रामीण तसेच शहरी भागातील कामगारांसाठी आर्थिक स्थिरता प्रदान करेल. सहकारी मूल्ये जिवंत ठेवण्याचे यश झाल्यास, इतर सेवा क्षेत्रांमध्येही अशा मॉडेलचा प्रसार होण्याची शक्यता आहे.

'भारत टॅक्सी' ही फक्त व्यवसाय संकल्पना नाही; ती सामाजिक न्याय व आर्थिक समतोल यांचा संदेश आहे.

## प्रासंगिक »

### नेताजी सुभाषचंद्र बोस

***नेताजी सुभाषचंद्र बोस हे लहानपणापासून अत्यंत बुद्धिमान आणि ध्येयवेडे होते. त्यांच्या वडिलांची इच्छा होती की त्यांनी आयसीएस अधिकारी व्हावे.***

वडिलांच्या इच्छेखातर ते इंग्लंडला गेले आणि आयसीएस परीक्षा उत्तीर्णही झाले. मात्र इंग्रजांच्या सत्तेखाली काम करणे त्यांच्या स्वाभिमानाला पटणारे नव्हते. एकीकडे उच्च पद, मान-सन्मान आणि सुरक्षित भविष्य होते; तर दुसरीकडे देशसेवेचा कठीण पण सन्मानाचा मार्ग होता. अंतर्मनात मोठे द्वंद्व सुरू होते. शेवटी राष्ट्रसेवेची भावना जिंकली आणि त्यांनी आयसीएस पदाचा राजीनामा दिला. त्यांच्या निर्णयाला वडिलांनीही अभिमानाने पाठिंबा दिला. सुभाषबाबूंनी साधेपणाने जगण्याची तयारी दर्शवली आणि देशसेवेसाठी स्वतःला अर्पण केले. त्यांच्या ठाम निर्धाराने आणि कुटुंबाच्या समर्थनाने त्यांना पुढील संघर्षासाठी बळ दिले.

-तात्पर्य: खरे ध्येय मोठे असेल तर मान, पैसा आणि पद यांचा त्याग करावा लागतो. कुटुंबाचे प्रोत्साहन आणि ठाम निर्धार असला तर राष्ट्रसेवा यशस्वी होते.

राजधानीत अलीकडेच कृत्रिम बुद्धिमत्तेवरील भव्य आंतरराष्ट्रीय परिषद पार पडली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने आयोजित या परिषदेत जगभरातील तज्ज्ञ सहभागी झाले.

# विरोधकांच्या आक्रमकतेमुळे सरकार अडचणीत

अमेरिका-चीनसारख्या महासत्तांच्या तोडीस तोड तंत्रज्ञानक्षमता भारतात विकसित होऊ शकते का, याबाबत चर्चा रंगली. मात्र उद्घाटन सोहळ्यातील गैरव्यवस्थेमुळे कार्यक्रमाला गालबोट लागले. माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी जाहीर माफी मागितली, तरी सुरुवातीलाच निर्माण झालेल्या त्रुटींनी सरकारची प्रतिमा मलिन केली.



दरम्यान, संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा ९ तारखेपासून सुरू होणार आहे. त्याआधीच संसदीय कार्यमंत्री किरण रिजीजू यांनी विरोधकांनी गोंधळ घातल्यास विविध मंत्रालयांच्या मागण्यांवरील चर्चा न घेता 'गिलोटिन'चा वापर करू, असा इशारा दिला. गिलोटिन म्हणजे अर्थसंकल्पावरील चर्चा अकाली संपवण्याची संसदीय पद्धत. या भूमिकेमुळे सरकार विरोधकांच्या आक्रमकतेबाबत सावध झाल्याची चर्चा आहे, विशेषतः राहुल गांधी अधिक आक्रमक भूमिका घेतील या पार्श्वभूमीवर.

एआयच्या वापरासंबंधी लोकसभा अध्यक्षांवर तयार केलेल्या काँग्रेसच्या रीलमुळे वाद निर्माण झाला आहे. अविश्वास प्रस्तावाच्या हालचालींनंतर सरकार विरोधी पक्षांमध्ये फूट पाडण्याच्या प्रयत्नात असल्याचे चित्र आहे. तृणमूल काँग्रेसने प्रस्तावावर स्वाक्षऱ्या न केल्याने सत्ताधाऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला. अध्यक्ष ओम बिर्ला यांना बांगलादेशातील शपथविधीला पाठवून पंतप्रधानांनी त्यांच्यावरचा विश्वास दर्शविल्याचे मानले जाते.

एप्स्टीन फाइल्समधील खुलाशांमुळे केंद्रीय मंत्री हरदीप पुरी यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. पंतप्रधानांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत पाठिंबा दर्शवला असला, तरी विरोधकांनी मोदी पंतप्रधान झाल्यानंतरच्या भेटींचा उल्लेख करून प्रश्न उपस्थित केले आहेत. बिल गेट्स यांनी एआय परिषदेला अनुपस्थित राहिल्यानेही चर्चा रंगली. भाजपचे असंतुष्ट नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी समाजमाध्यमांवरून थेट प्रश्न उपस्थित केले.

भाजपमध्येही सर्व काही सुरळीत नसल्याची चिन्हे दिसत आहेत. उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ आणि अन्य नेत्यांतील मतभेद, ब्राह्मण समाजातील नाराजी, तसेच मतदारयादी पुनरावलोकनाबाबतच्या तक्रारी यामुळे वातावरण तापले आहे. अमेरिकेबरोबरच्या व्यापार करारावरूनही वाद सुरू असून शेतकरी संघटना आणि काँग्रेस आक्रमक झाल्या आहेत. अनेक आघाड्यांवर सरकारवर दबाव वाढताना दिसत आहे.

## ।। अभंगवाणी ।।



हाचि नेम आतां न फिरें माघारी ।
बैसलें शेजारीं गोविंदाचे ॥१॥

घररिघी जालें पट्टराणी बळें ।
वरिलें सांवळें परब्रम्ह ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# प्रॉपिलीन गॅस टँकरचा पुन्हा एकदा अपघात

## २० दिवसांत दुसरी घटना; ज्वलनशील वायू टँकर सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

**महाईन्यूज । अलिबाग**

**मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर पुन्हा एकदा प्रॉपिलीन गॅस टँकरचा अपघात झाला. अमृतांजन पुलाजवळ टँकरचा ब्रेक निकामी झाल्याने टँकरने कठड्याला धडक दिली. त्यामुळे काही काळ वाहतुक विस्कळीत झाली होती. गेल्या २० दिवसात प्रोपलीन गॅस टँकरचा द्रुतगती मार्गावर अपघात होण्याची ही दुसरी घटना आहे. ३ फेब्रुवारीला आडोशी बोगद्या जवळ प्रोपलीन गॅस घेऊन जाणारा टँकर उलटला होता.**



गॅस गळती मुळे महामार्गावरील वाहतूक ३६ तास विस्कळीत झाली होती. सोमवारी या अपघाताची पुन्हा एकदा पुनरावृत्ती झाल्याने, महामार्गावरील अती ज्वलनशील वायूंच्या वाहतुक करणाऱ्या टँकरच्या सुरक्षेचा मुद्दा चर्चेत आला आहे.

हा ट्रक २१ टक प्रोपिलीन गॅस घेऊन कोचीहून गुजरातकडे निघाला होता. सकाळीच्या सुमारास मुंबई पुणे द्रुतगती मार्गावरून जात असतांना टँकरचा ब्रेक निकामी झाल्याचे चालकाच्या निदर्शनास आले. बोरघाटात तीव्र उतारावर ही घटना घडल्याने, गंभीर अपघाताची शक्यता निर्माण झाली होती. धोकादायक वळणे आणि तीव्र उतार यामुळे वाहनांवर नियंत्रण मिळवणे कठीण झाले होते. त्यामुळे चालकाने प्रसंगावधान राखत रसत्याच्या कडेला असलेल्या रिटेनिंग वॉलला धडक देऊन टँकर नियंत्रित केला. या धडकेमुळे टँकर जागीच थांबला आणि मोठा अनर्थ टळला. घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.


घटनेची माहिती मिळताच महामार्ग वाहतूक पोलीस, आयआरबी पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणेची फायर ब्रिगेड, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान तसेच हेल्प फाउंडेशनची टीम घटनास्थळी दाखल झाली. सुरक्षेच्या दृष्टीने मुंबईकडे जाणारी वाहतूक काही काळ पूर्णतः बंद ठेवण्यात आली.हेल्प फाउंडेशनचे केमिकल तज्ज्ञ धनंजय गीध यांनी टँकरची तांत्रिक स्थिती, दाब व संभाव्य गळतीचा धोका यांची तपासणी करून सुरक्षिततेची जबाबदारी सांभाळली. त्यानंतर क्रेन व पुलरच्या सहाय्याने टँकर अपघातस्थळापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावरील मोकळ्या जागेत हलविण्यात आला.ही संपूर्ण प्रक्रिया खोपोली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे आणि महामार्ग वाहतूक पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्निल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. आरटीओ अधिकारी रावते यांनी वाहनाची तांत्रिक तपासणी केली असून, अपघाताची नोंद खोपोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. टँकर ओढणारे वाहन पूर्णतः निकामी झाले असून, दुसऱ्या वाहनाच्या सहाय्याने टँकर गुजरातकडे रवाना करण्यात येणार आहे.अलिकडच्या काळात प्रोपिलीन गॅस वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या सलग घटनांमुळे चिंता व्यक्त होत आहे. उतारावर ब्रेक फेल झाल्यानंतर वाहन अनियंत्रित झाले असते, तर मोठ्या प्रमाणावर जीवितहानी आणि पर्यावरणीय नुकसान संभवले असते. या पार्श्वभूमीवर धोकादायक रसायनांची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कडक तपासणी, नियमित फिटनेस चाचण्या आणि संबंधित कंपन्यांनी विशेष सुरक्षा उपाययोजना करावी अशी मागणी केली जात आहे.

---

# "बदनामीला कामातूनच उत्तर!" उद्धव ठाकरेंकडून दादांची भावनिक आठवण

**महाईन्यूज । मुंबई**

**अलीकडच्या काळात अजित पवार यांनी वक्तव्य केले आपल्यावर ७० हजार कोटींचे आरोप केले त्यांच्यासोबतच आपण आहोत. अजित पवार यांनी आपल्या कामातून बदनामीला उत्तर दिले, त्यामुळे त्यांना सोबत घ्यावे लागले. दादा बदनामीने कधी खचले नाहीत, पण कोणाला आयुष्य नकोसे करेल इतकी बदनामी करू नये. कोणाला किती बदनाम करायचे याची मर्यादा पाळायला हवी. हे राजकारण आणि ही महाराष्ट्राची संस्कृती नाही, अशा भावना माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विधान परिषदेत व्यक्त केल्या.**



विधान परिषदेत अजित पवार यांच्या शोकप्रस्तावावर भावना व्यक्त करताना माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा कंठ दाटून आला आणि ते भावूक झाले. महाराष्ट्राने एक कर्तबगार, उमदे आणि प्रभावी नेतृत्व गमावले आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. राज्याला ज्यांच्याकडून मोठ्या अपेक्षा होत्या अशी प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, आर. आर. पाटील आणि आता अजित दादा ही नेतेमंडळी अचानक काळाच्या पडद्याआड जाणे हे महाराष्ट्राचे दुर्दैव असल्याचे त्यांनी नमूद केले. अशी व्यक्तिमत्त्वे वारंवार जन्माला येत नाहीत आणि असे जिवाभावाचे सहकारी, असे जिवलग मित्र पुन्हा लाभत नाहीत, असे ते हळहळ व्यक्त करत म्हणाले.

सभागृहात नेहमी उपस्थित राहून ठाम भूमिका मांडणारे अजित दादा आज त्या जागी दिसत नाहीत, ही पोकळी प्रत्येकाच्या मनाला वेदना देणारी आहे, असे ठाकरे म्हणाले. आपल्या राजकीय प्रवासाच्या सुरुवातीच्या टप्प्याची आठवण करून देताना त्यांनी सांगितले की, माझी कारकीर्द ही अजित दादांच्या पक्षाच्या आणि त्यांच्या विचारसरणीच्या ठाम विरोधातून सुरू झाली होती. आम्ही कधी एकाच व्यासपीठावर एकत्र येऊ, अशी कल्पनाही त्या काळी मनात आली नव्हती.

मात्र राजकारणात काही सकाळी इतिहास घडवतातअशाच दोन सकाळी महाराष्ट्राने अनुभवल्या. त्यापैकी एक सकाळ त्यांच्या राजकीय कृतीमुळे राज्याला धक्का देणारी ठरली, तर दुसरी सकाळ त्यांच्या निधनाच्या बातमीने अंतःकरणाला चटका लावणारी होती, असे सांगताना उद्धव ठाकरे यांच्या भावना पुन्हा एकदा दाटून आल्या.

### बारामती पोरकी झाली

मुख्यमंत्री असताना बारामतीत अजितदादांना फिरताना ते उत्साहात तिथला कायापालट दाखवत होते, पण दुर्घटनेनंतर मध्यरात्री मी जेव्हा तिकडे गेलो, तेव्हा ती बारामती पोरकी झालेली वाटली. त्यांची कामाची शिस्त जबरदस्त होती. ते कायम वेळ पाळत असत, म्हणून त्यांना घड्याळाची निशाणी मिळाली असावी. त्यांच्यासमोरचे टेबल, पेन, कागद हे व्यवस्थित काटकोनात असायचे. ही सवय शिवसेना प्रमुखांनासुद्धा होती, असे ते म्हणाले. प्रशासकीय कामकाजामध्ये त्यांचा खंबीर पाठिंबा होता. अजित दादांसारखा एक भरोसेमंद उत्तम दिलदार केवळ सहकारीच नव्हे तर मित्र मी गमावला.

# अमेरिका-इराण युद्ध भडकणार?

## भारतीय दूतावासाकडून इराण सोडण्याचं भारतीयांना आवाहन

**महाईन्यूज । इराण**

**अमेरिका आणि इराण या दोन देशांमधील तणाव कमालीचा वाढला आहे. यादरम्यान अमेरिका आगामी काळात इराणवर हल्ला करण्याची शक्यता आहे. यादरम्यान भारत सरकारने इराणमधील भारतीय नागरिकांना देश सोडण्याचे आवाहन केले आहे.**





भारतीय दूतावासाने प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये आपल्या नागरिकांना व्यावसायिक विमाने यासारख्या उपलब्ध असलेल्या वाहतुकीच्या साधनांचा वापर करून इराण सोडण्याचे आवाहन केले आहे. या मार्गदर्शक सूचना इराणमध्ये असलेले विद्यार्थी, धार्मिक स्थळांना भेट देण्यासाठी गेलेले नागरिक, व्यावसायिक आणि पर्यटक अशा सर्व भारतीय नागरिकांना देण्यात आली आहे.

“१४ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचनांचा पुनरुच्चार करण्यात येत आहे की, सर्व भारतीय नागरिक आणि भारतीय वंशाच्या नागरिकांनी (PIOS) योग्य ती काळजी घ्यावी, निदर्शने किंवा आंदोलने केले जात असलेल्या भागांमध्ये जाणे टाळावे, इराणमधील भारतीय दूतावासाच्या संपर्कात राहावे आणि सर्व घडामोडी जाणून घेण्यासाठी स्थानिक प्रसारमाध्यमांवर लक्ष ठेवावे,” असे या मार्गदर्शक सूचनांमध्ये सांगण्यात आले आहे. तसेच इराणमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांना पासपोर्ट आणि ओळखपत्र यासह प्रवास आणि इमिग्रेशनसंबंधी त्यांची सर्व कागदपत्रे त्यांच्याबरोबर तयार ठेवण्याचा सल्ला देखील देण्यात आला आहे. तसेच कोणत्याही मदतीसाठी भारतीय दूतावासाशी संपर्क साधावा असे आवाहन देखील करण्यात आले आहे.

भारतीय दूतावासाने इमर्जन्सी क्रमांक आणि ईमेल देखील जारी केले आहेत. फोन क्रमांक – +989128109115, +989128109109, +989128109102, +989932179359.

ईमेल – CONS.TEHRAN@MEA.GOV.IN


### अमेरिका इराणवर हल्ला करणार?

गेल्या महिन्यात इराणमध्ये झालेले आंदोलन सरकारने हिंसकपणे चिरडून टाकल्यानंतर अमेरिका इराणमध्ये सैन्य हस्तक्षेपाच्या धमक्या देत आहे. गेल्या महिन्यापासून अमरेकेने मध्य पूर्वेत मोठ्या प्रमाणात सैन्य तैनात केले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मागच्या आठवड्यात पुन्हा एकदा आपण इराणवर हल्ला करण्याचा विचार करत असल्याचे म्हटले होते. तर दुसरीकडे अण्वस्त्र कार्यक्रमाबाबत दोन्ही देशांमध्ये चर्चा देखील सुरू आहे. मात्र या चर्चेतून कोणताही तोडगा निघताना दिसत नाहीये.

## ४०० कोटींचा पूल ४ वर्षांत कोसळला; भ्रष्टाचाराचा स्फोट!

**महाईन्यूज । मध्य प्रदेश**

**भ्रष्टाचाराने आपल्या देशाला किती पोखरले आहे, याचे ताजे उदाहरण मध्य प्रदेशातून समोर आले आहे. येथील जबलपूर-भोपाळ राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 45 (NH-45) वरील वना रेल्वे ओव्हरब्रिजचा एक भाग कोसळण्याची घटना समोर आली आहे. हा फक्त अपघात नसून, सरकारी बांधकामाच्या दर्जावर आणि व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित करणारी बाब आहे.**





भोपालकडून जबलपूरकडे येणाऱ्या रेल्वे ओव्हरब्रिजचा एक भाग गेल्या काही महिन्यांपासून अत्यंत खराब आणि धोकादायक अवस्थेत असल्याचे स्थानिकांच्या निदर्शनास येत होते. सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून त्या दिशेची वाहतूक पूर्णपणे बंद केली होती आणि केवळ जबलपूरहून भोपालकडे जाणाऱ्या एका लेनमधून मर्यादित वाहतूक सुरू ठेवण्यात येत होती. मात्र आता पुलाचा दुसराही भाग गंभीररीत्या क्षतिग्रस्त झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर प्रशासनाला तातडीने संपूर्ण वाहतूक दुसऱ्या मार्गावर वळवण्याचा निर्णय घ्यावा लागला आहे.

विशेष बाब म्हणजे, अवघ्या चार वर्षांपूर्वी सुमारे ४०० कोटी रुपये खर्च करून हा महत्त्वाचा पूल उभारण्यात आला होता. एवढ्या मोठ्या आर्थिक गुंतवणुकीनंतरही इतक्या कमी कालावधीत पुलाची अवस्था धोकादायक बनणे, ही अत्यंत चिंताजनक आणि गंभीर बाब मानली जात आहे. पूल कोसळल्याच्या घटनेनंतर प्रशासन, संबंधित कंत्राटदार तसेच बांधकामाशी निगडित यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर जोरदार टीका होत असून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

घटनेची माहिती मिळताच प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि कोणतीही अनुचित घटना टाळण्यासाठी वाहतूक पोलिसांसह स्थानिक पोलिसांचा मोठा बंदोबस्त विविध चौकांवर तैनात करण्यात आला आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आणि पर्यायी मार्गांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

हा रेल्वे ओव्हरब्रिज आणि तब्बल ५६ किलोमीटर लांबीचा जबलपूर–भोपाल मार्ग सुमारे ४०० कोटी रुपयांच्या खर्चातून चार वर्षांपूर्वी पूर्णत्वास गेला होता. इतक्या मोठ्या प्रकल्पानंतरही पुलाची गुणवत्ता आणि टिकाऊपणा यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी अधिक तीव्र होत आहे.

### MPRDC विरुद्ध NHAI, अधिकार क्षेत्रावर मतभेद

या घटनेनंतर जबाबदारीवरून दोन यंत्रणांमध्ये मतभेद समोर आले आहेत. मध्य प्रदेश रस्ते विकास महामंडळ (MPRDC) चे विभागीय व्यवस्थापक राकेश मोरे यांनी सांगितले की, हा NH-45 चा एप्रोच रोड असून प्री-कास्ट पॅनलचे मेंटेनन्स सुरू होते. काही तांत्रिक त्रुटी आढळल्याने दुरुस्ती केली जात होती. दुसरीकडे, NHAI ने अधिकृत निवेदन जारी करून स्पष्ट केले की, NH-45 वरील हा भाग NHAI च्या अधिकार क्षेत्रात नसून MPRDC अंतर्गत येतो. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, कंत्राटदाराची दोष दायित्व कालावधी अद्याप संपलेली नसल्याने प्रकल्पाचा हँडओव्हर झालेला नाही.

### ब्लॅकलिस्टेड कंपनीवर आधीच मोठे दंड

मेसर्स बागड इन्फ्रा कंपनीवर यापूर्वीही गंभीर आरोप झाले आहेत. 2021 मध्ये पर्यावरण परवानगीशिवाय अवैध उत्खनन प्रकरणी 3 कोटी रुपयांचा दंड, 2022 मध्ये नर्मदा काठ परिसरात अवैध खनन प्रकरणी 82 कोटी रुपयांचा दंड...या प्रकरणात राजस्थानच्या बांसवाडा येथील कंपनी संचालक विनोद जैन यांना नोटीस बजावण्यात आली होती.

### कोण होता कंत्राटदार?

रेल्वे ओव्हरब्रिजचे बांधकाम मेसर्स बागड इन्फ्रा कंपनी यांनी केले होते. सध्या या पुलावर दोष दायित्व कालावधी (DEFECT LIABILITY PERIOD) अंतर्गत देखभाल-दुरुस्तीचे काम सुरू होते आणि त्याचा खर्च संबंधित कंत्राटदाराकडूनच केला जात होता. विशेष म्हणजे, या कंपनीविरोधात आधीच ब्लॅकलिस्टिंगची कारवाई करण्यात आली आहे.

# BAFTA सोहळ्यात आलियाचा जलवा



लंडनमध्ये रविवारी रात्री 'ब्रिटिश अकादमी फिल्म अवॉर्ड्स' अर्थात 'BAFTA' पुरस्कार सोहळा मोठ्या थाटात पार पडला. या समारंभाला जागतिक पातळीवरचे अनेक दिग्गज कलाकार उपस्थित होते. यासह यंदा या सोहळ्याला भारतीय अभिनेत्री आलिया भट्टने देखील विशेष उपस्थिती लावली होती. ती या सोहळ्यात प्रेझेंटर म्हणून सहभागी झाली होती. आलियाच्या रेड कार्पेट लूकने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं होतं. अभिनेत्रीने यावेळी पांढऱ्या रंगाच्या स्टोलसह सिल्व्हर GUCCI गाऊन घातला होता. मात्र, यावेळी नेटकऱ्यांनी आलियाचं एका वेगळ्याचं गोष्टीसाठी कौतुक केलं आहे. याचा व्हिडीओ सर्वत्र तुफान व्हायरल होत आहे. अभिनेत्री आलिया भट्टला पुरस्कार प्रेझेंट करण्यासाठी 'बाफ्टा'च्या मंचावर आमंत्रित करण्यात आलं होतं. यावेळी तिने स्टेजवर एन्ट्री घेताच सर्वांना "नमस्कार..." म्हणत अभिवादन केलं. आलिया 'सर्वोत्कृष्ट नॉन-इंग्लिश फिल्म' हा पुरस्कार प्रेंझेट करण्यासाठी बाफ्टाच्या रंगमंचावर आली होती.

आलिया रंगमंचावर एन्ट्री घेऊन हिंदी भाषेत संवाद साधत म्हणाली, "नमस्कार! पुढचा पुरस्कार एका अशा चित्रपटाला प्रदान करण्यात येणार आहे...जो चित्रपट इंग्रजी भाषिक नाहीये."

यानंतर तिने या पुरस्काराचा अर्थ इंग्रजीत सुद्धा सांगितला आलिया म्हणाली, "सबटायटल्ससाठी सध्या घाई करू नका...कारण, मी हिंदीमध्ये आता हेच सांगितलं की पुढचा पुरस्कार अशा एका चित्रपटासाठी आहे जो इंग्रजी भाषिक सिनेमा नाहीये. कारण, चित्रपट अनेक विविध भाषांमध्ये तयार केले जातात पण, आपण सगळेच ज्यामुळे एकत्र जोडले गेलो आहोत ती असते सिनेमाची भाषा!... आणि आपण सर्वजण ही सिनेमाची भाषा खूप चांगल्याप्रकारे समजून घेतो." यानंतर आलियाने विजेत्याचं नाव जाहीर केलं. 'सेंटीमेंटल व्हॅल्यूज' या चित्रपटाला यंदाचा 'सर्वोत्कृष्ट नॉन-इंग्लिश फिल्म' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. यावर्षी हा सिनेमा ऑस्करसाठी देखील नामांकित झाला आहे.

# रश्मिका-विजय बांधणार लग्नगाठ...

दाक्षिणात्य मनोरंजनसृष्टीतील स्टार जोडी रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा हे दोघंही येत्या २६ फेब्रुवारीला लग्नबंधनात अडकणार आहेत. रश्मिका-विजय गेल्या अनेक वर्षांपासून एकमेकांना डेट करत आहेत. मात्र, या दोघांनीही कधीच आपलं नातं जाहीरपणे मान्य केलं नव्हतं. आम्ही फक्त चांगले मित्र आहोत असंच या दोघांकडून सांगितलं जायचं. अखेर रविवारी ( २२ फेब्रुवारी ) रात्री उशिरा इन्स्टाग्राम स्टोरी शेअर करत विजय-रश्मिकाने 'द वेडिंग ऑफ विरोश' असं कॅप्शन देत त्यांच्या नात्याची जाहीरपणे कबुली दिली. विजय-रश्मिकाचा शाही विवाहसोहळा राजस्थानमध्ये पार पडणार आहे. लग्नासाठी त्यांनी उदयपूरपासून साधारण २५ ते ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या 'आयटीसी मेमेंटोस' या लक्झरी हॉटेलची निवड केली आहे. 'आयटीसी मेमेंटोस' हे आलिशान हॉटेल शहराच्या गर्दीपासून दूर निसर्गरम्य वातावरणात स्थित आहे. याठिकाणी आलेल्या पर्यटकांना निसर्गरम्य वातावरण अन् शांततेचा अनुभव घेता येईल. इथून जवळच अरवली पर्वतरांगा सुद्धा आहेत.

या हॉटेलच्या अधिकृत वेबसाइटनुसार, याठिकाणी येणारे पर्यटक विविध श्रेणींमधील खोल्या राहण्यासाठी निवडू शकतात. व्हॅली व्ह्यू व्हिला, लेक व्ह्यू व्हिला, प्रीमियम व्हिला, अरवली SUITS, मेमेंटोस SUITS अशा विविध श्रेणीतील खोल्या याठिकाणी उपलब्ध आहेत. याठिकाणी प्रेसिडेंशियल आणि ग्रँड प्रेसिडेंशियल हे विशेष लक्झरी SUITS देखील आहेत. हे सगळे व्हिला स्विमिंग पूल, जकूझी या सुविधांनी परिपूर्ण असे आहेत.

आयटीसी मेमेंटोसमध्ये एकूण ११७ लहान व्हिला आहेत. याशिवाय विजय-रश्मिकाच्या लग्नाला येणाऱ्या पाहुण्यांसाठी जेवणाचा विशेष मेन्यू डिझाइन करण्यात आला आहे. याठिकाणी फिटनेस सेंटर, रॉयल स्पा सुद्धा आहे. पर्यटक या आलिशान हॉटेलमध्ये इन्फिनिटी पूलचा सुद्धा आनंद घेऊ शकतात.



# लग्नानंतर सामंथाचा दमदार 'कमबॅक'



लोकप्रिय अभिनेत्री समांथा रूथ प्रभू सध्या तिच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. अलीकडेच विवाहबंधनात अडकलेल्या सामंथाने काही काळ कुटुंबासोबत घालवला. मात्र आता तिने पुन्हा एकदा जोरदार कमबॅक करत नव्या चित्रपटाची घोषणा केली आहे. तिचा आगामी तेलुगू चित्रपट मा इंटी बंगाराम लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. समंथाने स्वतः सोशल मीडियावर या चित्रपटाचा नवीन पोस्टर शेअर करत रिलीज डेट जाहीर केली. 'मा इंटी बंगाराम' हा चित्रपट 15 मे 2026 रोजी चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे. पोस्टरमध्ये सामंथाचा साइड प्रोफाइल दिसतो. ती भिंतीमागून डोकावताना दिसत असून तिच्या चेहऱ्यावर सस्पेन्स आणि ठामपणा स्पष्ट जाणवतो. पोस्टरवरील "या उन्हाळ्यात थिएटरमध्ये भेटूया" या ओळीमुळे चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढली आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन NANDINI REDDY यांनी केले आहे. तर निर्मितीची जबाबदारी सामंथाचे पती राज निदिमोरू यांनी सांभाळली आहे. त्यामुळे हा प्रोजेक्ट वैयक्तिकदृष्ट्याही सामंथासाठी खास मानला जात आहे. काही दिवसांपूर्वी या चित्रपटाचा टीझरही प्रदर्शित झाला होता. टीझरमध्ये सामंथाचा पूर्णपणे वेगळा अंदाज पाहायला मिळाला. साडी परिधान करून ती दमदार ॲक्शन करताना दिसली. तिचा हा ॲक्शन अवतार चाहत्यांसाठी आश्चर्याचा धक्का होता. त्याचबरोबर ती कुटुंबातील जबाबदार आणि प्रेमळ सदस्य म्हणूनही दिसते. त्यामुळे या चित्रपटात ॲक्शनसोबतच भावनिक आणि कौटुंबिक नाट्यही पाहायला मिळणार असल्याचे संकेत मिळतात.

सामंथाने पोस्टर शेअर केल्यानंतर सोशल मीडियावर चाहत्यांनी भरभरून प्रतिक्रिया दिल्या. अनेकांनी "कमबॅक क्वीन" असे संबोधत तिचे कौतुक केले. काहींनी हा चित्रपट 2026 मधील सर्वात मोठा चित्रपट ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. लग्नानंतरची ही तिची पहिली रिलीज असल्यामुळे प्रेक्षकांच्या अपेक्षा अधिक वाढल्या आहेत.

# भारताची सेमीफायनलची वाट कठीण!

## फक्त दोन विजय पुरेसे नाहीत तर आता संघाला; कसं आहे समीकरण?

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये भारताला पहिल्या पराभवाला सामोरं जावं लागलं. अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेने यजमानांना तब्बल ७६ धावांनी पराभूत केला. यासह सुपर-८ मोहिमेची भारतासाठी अत्यंत निराशाजनक सुरुवात झाली. या मोठ्या पराभवामुळे उपांत्य फेरीत पोहोचण्याच्या भारताच्या आशांवर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. अजून दोन सामने बाकी असताना टीम इंडियाकडे आता चूकही करण्याची अजिबात संधी उरलेली नाही. शिवाय, त्यांच्या नेट रनरेटवर (NRR)ही मोठा परिणाम झाला आहे.**




दक्षिण आफ्रिकेने या सामन्याक नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. भारताने सुरुवातीला उत्कृष्ट गोलंदाजी करत क्विंटन डी कॉक, एडन मारक्रम आणि रायन रिकल्टन यांना पहिल्या पाच षटकांत माघारी धाडलं. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेची अवस्था २० धावांत ३ बाद अशी झाली होती. मात्र त्यानंतर डेव्हिड मिलर आणि डेवाल्ड ब्रेविस यांनी आक्रमक फलंदाजी करत प्रतिहल्ला चढवला आणि भारताला बचावात्मक भूमिकेत ढकललं. या भागीदारीच्या बळावर दक्षिण आफ्रिकेने १८५ धावांचा भक्कम डोंगर उभा केला. प्रत्युत्तरात भारताची वरची फळी पूर्णपणे कोसळली आणि संघाची अवस्था



५१ धावांत ५ बाद अशी झाली.

पॉवरप्लेमध्येच भारताने ३ विकेट्स गमावल्या आणि त्यानंतर ५१ धावांत ५ अशी अवस्था झाल्यानंतर भारतीय संघ सामन्यात पुनरागमन करू शकला नाही. एकट्या शिवम दुबेने ४२ धावांची खेळी केली, पण त्याला साथ न मिळाल्याने संघ सामन्यात झुंजही देऊ शकला नाही आणि परिणामी फक्त १११ धावांवर सर्वबाद झाला आणि सामना मोठ्या फरकाने गमावला. यामुळे आता भारताचा नेट रन रेट वजामध्ये गेला आहे.

### भारत उपांत्य फेरीत कसा पोहोचू शकतो?

- भारत सध्या 'करो या मरो' अशा स्थितीत आहे. सुपर-८ मधील कमीत कमी २ सामने जिंकत संघ सुपर-८ गाठू शकतो. पण भारताची सुरूवात इतकी वाईट झाली आहे की त्यांना आता एक चूकही पुढे करून चालणार नाही. भारताचा पुढील सामना गुरुवारी २६ फेब्रुवारीला चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम स्टेडियमवर झिम्बाब्वेविरुद्ध होणार आहे. त्यानंतर दुसऱ्या फेरीतील अखेरच्या सामन्यात रविवारी २७ फेब्रुवारीला कोलकात्याच्या ईडन गार्डन्सवर वेस्ट इंडिजशी सामना रंगणार आहे.
  भारताला केवळ स्वतःचे दोन्ही सामने जिंकणं पुरेसे ठरणार नाही, तर दक्षिण आफ्रिकेने झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिज या
- दोन्ही संघांना पराभूत करणं हेदेखील गरजेचं असणार आहे. अन्यथा परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होऊ शकते. जर मारक्रमच्या संघ झिम्बाब्वे-वेस्ट इंडिज सामन्यात पराभूत झाला, तर भारताने दोन विजय मिळवूनही उपांत्य फेरीचं समीकरण अवघड होऊ शकतं, कारण तीन संघ चार गुणांवर बरोबरीत येऊ शकतात.
- अशा परिस्थितीत सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील संघाला केवळ विजयच नव्हे, तर मोठ्या फरकाने विजय मिळवणं आवश्यक ठरेल, जेणेकरून नेट रनरेट (NRR) सुधारता येईल आणि पुढील फेरीचे तिकीट निश्चित करता येईल.

# महिला क्रिकेट संघाच्या माजी कर्णधाराचे लैंगिक शोषण!

**महाईन्यूज । ढाका**

**बांगलादेश क्रिकेटमध्ये खळबळ उडवून देणाऱ्या एका लैंगिक छळाच्या प्रकरणात बांगलादेश क्रिकेट बोर्डाने अखेर कठोर पाऊल उचलले आहे. महिला क्रिकेट संघाची माजी कर्णधार जहाँआरा आलम हिने केलेल्या गंभीर आरोपांची दखल घेत, बोर्डाने महिला संघाचे माजी मुख्य निवडकर्ते आणि माजी क्रिकेटपटू मोंजुरुल इस्लाम याच्यावर सर्व प्रकारच्या क्रिकेट क्रियाकलापांपासून आजीवन बंदी घातली आहे.**



जहाँआरा आलमने गेल्या वर्षी एका मुलाखतीत मोंजुरुल इस्लाम याच्यावर गंभीर आरोप केले होते. मोंजुरुल हा संघाचा मुख्य निवडकर्ता असताना त्याने अनेकदा आपल्याला चुकीच्या पद्धतीने स्पर्श केला, अस्वस्थ करणारे हावभाव केले आणि वैयक्तिक आयुष्याबद्दल (मासिक पाळीच्या चक्राबद्दल) आक्षेपार्ह प्रश्न विचारले, असा आरोप जहाँआराने केला होता. या प्रकारामुळे त्रस्त होऊन तिने डिसेंबर २०२४ पासून क्रिकेटमधून ब्रेक घेतला होता.

वाढत्या दबावानंतर बीसीबीने या प्रकरणाच्या चौकशीसाठी एक स्वतंत्र समिती स्थापन केली होती. या समितीने नुकताच आपला अहवाल बोर्डाला सादर केला. रविवारी ढाका येथे झालेल्या बीसीबीच्या बैठकीत या अहवालावर चर्चा झाली आणि त्यानंतर मोंजुरुल इस्लाम यांच्यावर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला.

बीसीबीने आपल्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, "स्वतंत्र चौकशी समितीच्या निष्कर्षांच्या आधारे, माजी राष्ट्रीय क्रिकेटपटू मोंजुरुल इस्लाम यांना बीसीबीच्या अंतर्गत कोणत्याही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष क्रिकेट उपक्रमात सहभागी होण्यापासून प्रतिबंधित करण्यात आले आहे. त्यांना भविष्यातील सर्व भूमिकांसाठी बंदी घालण्यात येत आहे."

बीसीबीने हेदेखील स्पष्ट केले आहे की ही केवळ सुरुवात आहे. बोर्ड सध्या समितीच्या इतर शिफारशींचे पुनरावलोकन करत असून, गरज पडल्यास इस्लाम यांच्यावर कायदेशीर किंवा इतर कठोर कारवाई केली जाऊ शकते.

### बोर्डाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

जहाँआराच्या दाव्यानुसार, तिने सुरुवातीला बीसीबीचे वरिष्ठ अधिकारी नाडेल चौधरी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी निजामुद्दीन चौधरी यांच्याकडे रीतसर तक्रार केली होती. मात्र, त्यावेळी तिच्या तक्रारीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले. तक्रार करूनही इस्लाम यांने जून २०२५ पर्यंत आपला कार्यकाळ आरामात पूर्ण केला, ज्यामुळे बोर्डाच्या कार्यपद्धतीवर टीका होत होती.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। मंगळवार ।

दि. 24 फेब्रुवारी 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# रात्रीच्या स्वच्छता मोहिमेत महिलांची शिफ्ट बंद!

## महापौर रवि लांडगे यांनी घेतली आरोग्य विभागाची घेतली आढावा बैठक

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड शहरात सुरू असलेल्या रात्रीच्या स्वच्छता उपक्रमासह आरोग्य विभागाच्या कामकाजाचा आढावा महापौर रवि लांडगे यांनी आज घेतला. यावेळी रात्रीच्या स्वच्छता मोहिमेत महिलांची शिफ्ट बंद करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. संबंधित अधिकाऱ्यांकडून उपक्रमाचे फायदे जाणून घेतल्यानंतर रात्रीची स्वच्छता मोहीम सुरू ठेवावी; मात्र त्यामध्ये केवळ पुरुष कर्मचाऱ्यांचा सहभाग ठेवावा, असेही ते म्हणाले. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.**



शहरात उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी, असेही निर्देश त्यांनी दिले. शहर स्वच्छ ठेवणे ही प्रशासनासोबत नागरिकांचीही जबाबदारी आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी. त्याचबरोबर शहरातील स्वच्छतेचा रोडमॅप तयार करण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले. महापालिकेच्या दिवंगत मधुकर पवळे सभागृहात आरोग्य विभागाची आढावा बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते.

यावेळी आरोग्य विभागाच्या वतीने शहरातील कचरा संकलन, कचऱ्याचे विलगीकरण, त्याची वाहतूक, सार्वजनिक स्वच्छतागृहे, रस्ते साफसफाई, पाणी स्वच्छता यासह विविध आरोग्यविषयक योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. बैठकीस महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी तानाजी नरळे, अतुल पाटील, किशोर ननवरे, अजिंक्य येळे, राजाराम सरगर, निवेदिता घार्गे, अश्विनी गायकवाड, पूजा दूधनाळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह आरोग्य निरीक्षक व आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

तसेच अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनीही आरोग्य विभागाच्या संबंधित विविध विषयांचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. तसेच उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी आरोग्य विभागाच्या कामकाजाबाबत सविस्तर माहिती देत येणाऱ्या अडचणी मांडल्या. मनुष्यबळ, वाढती लोकसंख्या आणि काही भागांतील अंमलबजावणीतील अडथळे यावर त्यांनी प्रकाश टाकला. या सर्व बाबींवर प्रभावी उपाययोजना करून शहरातील स्वच्छता व आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.

### ‘माझी वसुंधरा’ पुरस्कार मिळाल्याबद्दल केले अभिनंदन

पिंपरी चिंचवड महापालिकेला ‘माझी वसुंधरा’ हा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल आरोग्य विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे महापौरांनी अभिनंदन केले. हा पुरस्कार केवळ सन्मान नसून मोठी जबाबदारी असल्याचे सांगत पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि शाश्वत विकासाच्या दिशेने सातत्याने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# डी. वाय. पाटील फार्मसी महाविद्यालयात रंगला सांस्कृतिक जल्लोष

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आकुर्डी येथील डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ फार्मसी येथे ‘दृष्टी-२०२६’ या वार्षिक स्नेहसंमेलनाचे रंगतदार व उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. आठवडाभर चाललेल्या या सांस्कृतिक महोत्सवात विद्यार्थ्यांनी नृत्य, फॅशन शो, गीतगायन, लाईव्ह म्युझिक अशा विविध स्पर्धा आणि कार्यक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.**



कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी लाईव्ह म्युझिक सादर करत उत्साहपूर्ण वातावरण निर्माण केले. विविध गाण्यांवर ताल धरत विद्यार्थ्यांनी सहगायनाचा मनमुराद आनंद घेतला. या कार्यक्रमामुळे महाविद्यालयीन परिसरात आनंद, ऊर्जा आणि सर्जनशीलतेचे वातावरण अनुभवायला मिळाले.

महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती व पारंपरिक वेशभूषा दिन एकत्रितपणे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी ढोल-ताशा पथकाच्या गजरात वातावरण दणाणून सोडले. पोवाड्यांच्या जोशपूर्ण सादरीकरणातून शिवचरित्रातील पराक्रम, शौर्य आणि स्वराज्याची प्रेरणा प्रभावीपणे उभी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पथनाट्यातून देशभक्ती, सामाजिक जाणीवा आणि एकात्मतेचा संदेश देण्यात आला. पारंपरिक वेशभूषा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी मराठमोळ्या तसेच भारतीय पारंपरिक पोशाखात सहभाग नोंदवून भारतीय संस्कृतीचे वैभव साकारले.

तसेच ‘नेटफ्लिक्स डे’ या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी विविध चित्रपट आणि वेब सिरीजमधील प्रसिद्ध पात्रांची वेशभूषा साकारून रॅम्पवॉक आणि अभिनय सादर केला. या अभिनव उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि संवाद कौशल्ये वृद्धिंगत झाली.

समारोप सोहळ्यात ‘कला दर्शन’ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध कलागुण सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळाला तसेच महाविद्यालयीन जीवनात आनंददायी आणि संस्मरणीय क्षण निर्माण झाले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नीरज व्यवहारे, औषधनिर्माणशास्त्र पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव देशपांडे, उपप्राचार्या डॉ. शिल्पा चौधरी तसेच सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. संकुल संचालक रिअर ॲडमिरल अमित विक्रम (नि.) यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले.


‘दृष्टी-२०२६’चे नियोजन सांस्कृतिक विभागाचे समन्वयक प्रा. मुकेश मोहिते, प्रा. अंजू कल्याणकर, प्रा. अश्विनी गावीत, डॉ. निकिता पारगे तसेच विद्यार्थी प्रतिनिधी खुशी पटेल, आनंद कुमार, ओवैस खान, मंजुसा बेडसे, साक्षी पोळ, अर्पिता लाड, आणि विघ्नेश कांबळे यांनी केले.

# AI युगातील व्यवस्थापनावर जागतिक स्तरावरील स्पर्धा; विद्यार्थ्यांची संशोधन क्षमता उजळली...

## AI व्यवस्थापनाच्या नव्या क्षितिजांचा शोध; विद्यार्थ्यांमध्ये संशोधन आणि नाविन्याचे प्रोत्साहन

**महाईन्यूज । पुणे**

**एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळंदी, पुणे – व्यवसाय प्रशासन व आंतरराष्ट्रीय व्यवसाय विभागाने, संस्थात्मक नवोन्मेष परिषद (इन्स्टिट्यूट्स इनोव्हेशन कौन्सिल) आणि R&D सेलच्या सहकार्याने, मंगळवार, १० फेब्रुवारी २०२६ रोजी 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील व्यवस्थापनाची नव्याने पुनर्कल्पना' (REIMAGINING MANAGEMENT IN THE ERA OF AI) या विषयावर आंतरराष्ट्रीय स्तरावर ऑनलाईन संशोधन निबंध सादरीकरण स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले.**




> आजच्या जगात AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) केवळ एक तांत्रिक साधन किंवा उपकरण नाही. ते व्यवस्थापन आणि नेतृत्वाच्या प्रक्रियेत मूलभूत बदल घडवणारे एक शक्तिशाली साधन आहे. पारंपारिक व्यवस्थापनात मानवी निर्णय, अनुभव आणि मार्गदर्शनावर भर दिला जातो, तर AI च्या युगात डेटा-चालित निर्णय क्षमता, स्वयंचलित प्रक्रिया आणि विश्लेषणात्मक अंतर्दृष्टी या गोष्टी नेतृत्वाचा भाग बनल्या आहेत.
>
> – नोबोरू यामाडा, CEO, HILLTOP–TSUKI CONSULTING, टोकियो, जपान.

या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व्यवस्थापन पद्धती, निर्णय प्रक्रिया आणि विविध उद्योगांतील संस्थात्मक धोरणांमध्ये होणारे बदल यावर नाविन्यपूर्ण संशोधन सादर करण्यास प्रोत्साहित करणे हा होता. कार्यक्रमात नवोदित संशोधकांनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदवून व्यवस्थापनातील उदयोन्मुख AI अनुप्रयोगांवर सखोल आणि विश्लेषणात्मक संशोधन सादर केले.

या कार्यक्रमाचे ठळक आकर्षण जपानमधील टोकियो येथील हिलटॉप–त्सुकी सल्लागार संस्था चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. नोबोरू यामाडा यांचे प्रमुख व्याख्यान ठरले. त्यांनी जागतिक व्यवसाय परिसंस्थेमध्ये AI चा वाढता प्रभाव, आधुनिक संस्थांमध्ये अनुकूल नेतृत्वाची गरज आणि नैतिक AI प्रशासनाचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमात परीक्षक म्हणून इंडिकोस्मिक इन्फोटेक लिमिटेड, पुणे येथील क्रिएटिव्ह हेड श्री. बॉबिश बालन तसेच प्रतिभा वाणिज्य व व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे येथील व्यवसाय प्रशासन व आंतरराष्ट्रीय व्यवसाय विभागप्रमुख डॉ. हनुमंत कोळी यांची मान्यवर उपस्थिती लाभली. या स्पर्धेचे समन्वयन डॉ. जीवन कसबे यांनी केले, ज्यांच्या समर्पित प्रयत्नांमुळे हा आंतरराष्ट्रीय संशोधन कार्यक्रम सुरळीत पार पडला. तसेच, प्रा. आकांक्षा लांडे, डॉ. अमोल माने, सौ. मानसी अतीतकर, सौ. अक्षदा कुलकर्णी, डॉ. बी.बी. वाफारे यांचे सहकार्य कार्यक्रम यशस्वी करण्यात मोलाचे ठरले.

कार्यक्रमाच्या शेवटी एकूण ५२ सहभागी विद्यार्थ्यांना सन्मानित केले गेले. यामुळे शैक्षणिक संशोधन, माहिती विश्लेषण, साहित्य समीक्षा आणि शैक्षणिक लेखन कौशल्यांचा विकास झाला. तसेच, विविध संस्थांतील संशोधक आणि प्राध्यापकांशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध झाली, ज्यामुळे सांस्कृतिक आणि शैक्षणिक देवाणघेवाण वाढीस लागली.

### स्पर्धेतील विजेते...

मानव संसाधन व्यवस्थापनातील AI: प्रथम पारितोषिक – रोहन मत्ते (एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळंदी), द्वितीय पारितोषिक – सानिया इनामदार (डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज, पुणे), वित्तीय व्यवस्थापनातील AI: प्रथम पारितोषिक – ध्रुव जिवराजानी (एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळंदी), द्वितीय पारितोषिक – श्रीहरी मोहरिर (एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळंदी). विपणनातील AI: प्रथम पारितोषिक – आयुष सिंग (एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळंदी), द्वितीय पारितोषिक – अभिजीत शर्मा (एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळंदी), हा कार्यक्रम शैक्षणिक उत्कृष्टतेला चालना देणारा ठरला असून व्यवस्थापन शिक्षणात संशोधन, नाविन्य आणि जागतिक दृष्टीकोन वाढविण्याच्या संस्थेच्या बांधिलकीचे प्रतीक ठरला.

# पिंपळे सौदागर येथे भाजपाची 'टिफिन पे चर्चा' उत्साहात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून प्रेरित 'टिफिन पे चर्चा' या उपक्रमाचे आयोजन पिंपळे सौदागर येथे उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमात भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत संघटनात्मक बळकटीचा संदेश दिला.**



या बैठकीस नगरसेविका कुंदाताई भिसे, नगरसेविका अनिताताई काटे, श्री जयनाथ शेठ काटे, श्री मनोजराव ब्राम्हणकर तसेच स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उपक्रमांतर्गत सर्वांनी आपापले घरचे डबे एकत्र आणून सामूहिक भोजन केले. अनौपचारिक वातावरणात झालेल्या चर्चेमुळे कार्यकर्त्यांमध्ये मोकळेपणाने संवाद साधता आला. परिसरातील विकासकामे, नागरिकांच्या मूलभूत सुविधा, विविध शासकीय योजना तसेच आगामी उपक्रम यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे म्हणाले की, "'टिफिन पे चर्चा' ही संकल्पना कार्यकर्ते आणि नागरिकांमध्ये थेट संवाद साधण्याचे प्रभावी माध्यम आहे. एकत्र बसून घरचा डबा शेअर करताना निर्माण होणारे आपुलकीचे वातावरण संघटनात्मक बळकटीसाठी अत्यंत उपयुक्त ठरते. या उपक्रमामुळे पदानुसार असलेला भेद कमी होऊन समानता आणि एकतेची भावना दृढ होते. नागरिकांच्या समस्या, अपेक्षा आणि सूचनांची अचूक माहिती मिळविण्यास अशा संवादातून मोठी मदत होते."

त्यांनी पुढे सांगितले की, संघटन मजबूत करण्यासाठी आणि लोकांशी थेट संपर्क वाढवण्यासाठी अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येईल. समाजहितासाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याची प्रेरणा या माध्यमातून मिळते, असेही त्यांनी नमूद केले. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या 'टिफिन पे चर्चा' उपक्रमामुळे कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढला असून स्थानिक पातळीवर संघटन अधिक मजबूत करण्यास निश्चितच हातभार लागणार आहे.

> "भारतीय जनता पक्ष हा कार्यकर्त्यांच्या बळावर उभा असलेला पक्ष आहे. संघटनात्मक बांधणी मजबूत असेल तर कोणतेही उद्दिष्ट साध्य करणे शक्य होते. प्रत्येक बूथ स्तरापर्यंत पक्षाची रचना सक्षम करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढवण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. संघटित, शिस्तबद्ध आणि समाजाभिमुख कार्यपद्धतीमुळेच भाजपा जनतेचा विश्वास संपादन करू शकली आहे. आगामी काळातही अधिक सक्षम संघटन उभारून जनसेवा अधिक प्रभावीपणे करू."
>
> – शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# पिंपरीतील डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय व संशोधन केंद्र येथे ‘महाआरोग्य अभियान’

## १५-२८ फेब्रुवारीदरम्यान सवलतीत ऑपरेशन्स, मोफत तपासण्या आणि योजनांचा लाभ

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय व संशोधन केंद्र, पिंपरी येथे ‘महाआरोग्य अभियान’ या भव्य आरोग्य मोहिमेची सुरुवात करण्यात आली आहे. १५ ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान चालणाऱ्या या उपक्रमात ओपीडी व आयपीडी सेवांवर ५० टक्के सवलत देण्यात येत असून विविध मोफत तपासण्या व उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.**



मा. डॉ. पी. डी. पाटील, मा. डॉ. स्मिता जाधव आणि मा. डॉ. यशराज पी. पाटील यांच्या जन्मदिनानिमित्त हा उपक्रम आयोजित करण्यात आला असून मा. डॉ. (सौ.) भाग्यश्री पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मा. डॉ. सोमनाथ पाटील यांच्या संकल्पनेतून अभियान राबविण्यात येत आहे.

ही मोहीम दररोज सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत रुग्णालयाच्या हाय-टेक बिल्डिंगमधील बेसमेंट ओपीडी परिसरात आयोजित करण्यात आली आहे. समाजातील वंचित व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दर्जेदार आरोग्यसेवा सुलभ व परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

अभियानादरम्यान ओपीडी व आयपीडी उपचारांवर ५० टक्के सवलत देण्यात येत आहे. यामध्ये विविध शस्त्रक्रिया, अँजिओप्लास्टी व हृदय शस्त्रक्रिया, बालरोग व बालहृदय शस्त्रक्रिया, जन्मजात विकारांवरील शस्त्रक्रिया तसेच कॉक्लिअर इम्प्लांटसारख्या अत्याधुनिक सेवा उपलब्ध आहेत. मोतीबिंदू शस्त्रक्रिया, गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची तपासणी (पॅप स्मिअर), स्तन कर्करोग तपासणी (मॅमोग्राफी) तसेच सामान्य व सिझेरियन प्रसूती सेवा मोफत देण्यात येत आहेत. विशेष आकर्षण म्हणून अँजिओग्राफी केवळ ३,९९९ रुपयांत उपलब्ध करण्यात आली आहे. यासोबत रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत (PMJAY) आदी शासकीय योजनांअंतर्गत लाभार्थ्यांना या मोहिमेचा फायदा मिळणार आहे. लाभ घेण्यासाठी पांढरा, केशरी किंवा पिवळा रेशनकार्ड, PMJAY कार्ड, आधारकार्ड व पूर्वीच्या वैद्यकीय अहवालांची आवश्यकता आहे. या उपक्रमाबाबत कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांनी समाजाच्या आरोग्य व कल्याणासाठी संस्थेची बांधिलकी अधोरेखित केली. प्र-कुलपती डॉ. भाग्यश्री पाटील यांनी या अभियानातून गरजूंपर्यंत आशा व आधार पोहोचवण्याचा प्रयत्न असल्याचे सांगितले. प्र-कुलगुरू डॉ. स्मिता जाधव यांनी अशा मोहिमांमुळे आरोग्यसेवा अधिक सुलभ होऊन उपचारांवरील आर्थिक अडथळे कमी होतात, असे नमूद केले. तर विश्वस्त डॉ. यशराज पी. पाटील यांनी दर्जेदार आरोग्यसेवा वंचितांपर्यंत पोहोचवण्याचा संस्थेचा संकल्प व्यक्त केला.

महाआरोग्य अभियानाचे नियोजन व अंमलबजावणी वैद्यकीय अधीक्षक डॉ. एच. एच. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत असून ही मोहीम समाजातील गरजूंपर्यंत प्रभावीपणे पोहोचत आहे.

### सवलती, मोफत तपासण्या आणि योजनांचा लाभ

१५ ते २८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या ‘महाआरोग्य अभियान’ अंतर्गत ओपीडी-आयपीडी सेवांवर ५०% सवलत, मोतीबिंदू व प्रसूती सेवा मोफत, अँजिओग्राफी केवळ ₹३,९९९ मध्ये तसेच विविध शस्त्रक्रिया, कर्करोग तपासण्या व रक्तदान शिबिराची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. महात्मा फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत लाभार्थ्यांनाही लाभ मिळणार असून आवश्यक कागदपत्रांसह नागरिकांनी सकाळी ९ ते सायं. ५ या वेळेत हाय-टेक बिल्डिंग बेसमेंट ओपीडी येथे उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# फ्युजन क्लबची सिनेमॅटोग्राफी कार्यशाळा; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, आळंदी येथे फ्युजन क्लबतर्फे २० फेब्रुवारी २०२६ रोजी “एक दिवसीय सिनेमॅटोग्राफी कार्यशाळा व स्पर्धा” उत्साहात पार पडली. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण ३७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.**



कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे असोसिएट डीन डॉ. सुनील महाजन, फ्युजन क्लब समन्वयक प्रा. निकिता देवरे, तसेच क्लब सदस्य सिद्धी वाघचौडे आणि प्रा. प्रविण कार्ले उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यशाळेची सुरुवात करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या व्हिडिओग्राफी कौशल्यांचा विकास, सादरीकरणातील आत्मविश्वास वृद्धिंगत करणे आणि तांत्रिक ज्ञान वाढवणे हा कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. संसाधन व्यक्ती शुभम पोंपळे यांनी कॅमेरा अँगल्स, फ्रेमिंग, लाईटिंग, स्टोरीबोर्डिंग आणि एडिटिंग या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे शिकलेल्या संकल्पनांचा अनुभव घेतला.

कार्यशाळेनंतर सिनेमॅटोग्राफी स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेचे परीक्षण शार्प मल्टिमीडिया संस्थेचे सीईओ शुभम पोंपळे यांनी केले. विद्यार्थ्यांनी सर्जनशीलता, तांत्रिक कौशल्य आणि सादरीकरणाचा उत्कृष्ट संगम सादर केला.

स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम क्रमांकासाठी ₹१,०००, द्वितीय क्रमांकासाठी ₹७०० आणि तृतीय क्रमांकासाठी ₹५०० अशी पारितोषिके देण्यात आली.

कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ. बी. बी. वाफारे, शिक्षकवृंद तसेच फ्युजन क्लब सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होऊन त्यांच्या सर्जनशीलतेला नवे व्यासपीठ मिळाले.

### विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग...

एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, आळंदी येथे २० फेब्रुवारी २०२६ रोजी फ्युजन क्लबतर्फे आयोजित एकदिवसीय सिनेमॅटोग्राफी कार्यशाळा व स्पर्धेत ३७ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदवला गेला. कॅमेरा अँगल्स, लाईटिंग, फ्रेमिंग, स्टोरीबोर्डिंग व एडिटिंगचे मार्गदर्शन देत प्रत्यक्ष प्रात्यक्षिके घेण्यात आली. स्पर्धेत विजेत्यांना अनुक्रमे ₹१,०००, ₹७०० व ₹५०० पारितोषिके देण्यात आली.




# The World the Way I See It

**THE WORLD IS VERY BIG, AND I AM STILL LEARNING ABOUT IT EVERY DAY. WHEN I LOOK AROUND ME, I SEE MANY THINGS THAT MAKE ME HAPPY, CURIOUS, AND SOMETIMES A LITTLE CONFUSED. I SEE LOVE IN SMALL THINGS. MY MUMMY PACKS MY TIFFIN, MY PAPA HELPS ME CROSS THE ROAD, AND MY TEACHER SMILES WHEN I TRY MY BEST. WHEN MY TEACHER SAYS "GOOD JOB," OR GIVE ME STAR, MY DAY BECOMES BETTER.**

Sometimes the world also looks angry. I see people shouting on the road and on TV. When people shout too much, even my ears feel tired. I think the world needs more smiling and less shouting. I also notice some people do things that are not nice. Sometimes I see people spitting on the road or throwing garbage anywhere, my papa get angry to see this. I think they should go to school and learn, just like me. Their teacher could teach them how to take care of the Earth. I hope everyone learns to be kind to our world.

My teacher tells us about pollution. I see smoke from vehicles and plastic on the ground. I don't think the Earth likes that. If the Earth had a face, it would make a sad face. I want to keep my Earth clean and happy. After school, I feel homework stress sometimes. My school bag feels heavy, and homework looks long. I look at it, and it looks back at me. But when I finish it, I feel proud.

I love sports, especially football. When I run and play, i enjoy.. Kicking the ball and running fast makes me happy. I also love watching cartoons, especially Masha and the Bear. In one episode, I saw Masha go to the Moon. She was jumping and having fun. I also want to go to the Moon one day, but I know it is not easy. Sometimes even the sky plays with me. Once I saw clouds that looked like ice cream. I wanted to eat them, but they were too far. I think the world can be a better place if we love more, shout less, play more, and take care of our Earth.I am small, but my world is big, funny, and beautiful.



Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE

**By YATHARTH SHUKLA**
**GRADE -1**

# Palkhi Route Works in Dehu and Alandi to Be Completed Before May 15

**MahaEnews I PUNE**

In preparation for the upcoming Ashadhi Wari, District Collector Jitendra Dudi has directed all concerned departments to complete development and infrastructure works along the Dehu and Alandi Palakhi routes before May 15. The decision was taken during a joint review meeting with representatives of the Dehu and Alandi Sansthans and senior administrative officials.

The administration has ordered completion of the five-kilometre Dehu–Dehu Road widening, with three kilometres under the Public Works Department and two kilometres within the Pimpri-Chinchwad Municipal Corporation limits. Necessary approvals from the Dehu Road Cantonment Board will also be pursued, and the 500-metre stretch up to the Dehu temple will be developed under an urban development scheme.

As Akurdi is the first halt of the Sant Tukaram Maharaj Palakhi, officials have been instructed to conduct a joint inspection and arrange temporary space due to limited land availability. Metro work between Kalbhor Nagar and Akurdi must also be completed before the procession. The halt area at Loni Kalbhor will be expanded, and issues at Gavalyachi Undwadi, Sansar and Nimgav Ketki will be resolved.

For the Alandi route, uninterrupted night lighting from Sanchati to FC Road will be ensured. Obstacles on the Borawke Mala–Saswad bypass will be removed and barricades installed at Dive Ghat. To avoid traffic congestion, cranes will accompany the convoy to handle vehicle breakdowns. The old bridge at Nira will be demolished immediately, and pending road works up to PCMC limits will be fast-tracked.

The administration also directed availability of ambulances during the return Wari. Representatives of both Sansthans expressed satisfaction over the administration's prompt response and assurances.

